महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

=====================================================================

जावक क्रमांक – ८१६ /९२ दिनांक :- १२ जुलै, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडा कोकण मंडळातर्फे ५ हजार २८५ सदनिका व ७७ भूखंड विक्रीकरिता सोडत जाहीर

**१४ जुलै २०२५ रोजी 'म्हाडा'चे उपाध्यक्ष श्री. संजीव जयस्वाल यांच्या हस्ते सोडतीचा 'गो-लाइव्ह' समारंभ; ०३ सप्टेंबर २०२५ रोजी पात्र अर्जांची संगणकीय सोडत**

मुंबई, दि. १२ जुलै, २०२५ : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा (म्हाडा) विभागीय घटक कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे ठाणे शहर व जिल्हा, वसई (जि. पालघर) येथील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत ५ हजार २८५ सदनिका व ओरोस (जि. सिंधुदुर्ग), कुळगाव-बदलापूर येथील ७७ भूखंड विक्रीकरिता सोडत जाहीर करण्यात आली आहे. सदर सोडतीसाठी अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेचा शुभारंभ 'गो-लाइव्ह' कार्यक्रमांतर्गत सोमवार, दिनांक १४ जुलै, २०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजता 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

कोकण मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेली ही सोडत पाच घटकांमध्ये विभागण्यात आली आहे. २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत एकूण ५६५ सदनिका, १५ टक्के एकात्मिक शहर गृहनिर्माण योजनेअंतर्गत ३००२ सदनिका, म्हाडा कोकण मंडळ गृहनिर्माण योजना व विखुरलेल्या सदनिका आहे त्या स्थितीमध्ये या योजनेअंतर्गत १६७७ सदनिका, म्हाडा कोकण मंडळ गृहनिर्माण योजनेअंतर्गत (५० टक्के परवडणाऱ्या सदनिका) ४१ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तसेच म्हाडा कोकण मंडळ गृहनिर्माण योजनेअंतर्गत ७७ भूखंड विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

सदर सोडतीसाठी दि. १३ ऑगस्ट, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत आहे. दिनांक १४ ऑगस्ट, २०२५ रात्री ११.५९ वाजेपर्यंत अर्जदार अनामत रकमेचा भरणा ऑनलाईन करू शकतील. सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे अर्जदार या प्रणालीद्वारे पात्र ठरविले जातील. सोडतीसाठी स्वीकृत अर्जांची प्रारूप यादी २१ ऑगस्ट, २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता 'म्हाडा'च्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ०६ .०० वाजेपर्यंत अर्जदारांना प्रारूप यादीवर आपल्या दावे व हरकती नोंदविता येणार आहेत. सोडतीसाठी स्वीकृत अर्जाची अंतिम यादी दिनांक ०१ सप्टेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता 'म्हाडा'च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

दिनांक ०३ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता पात्र अर्जाची संगणकीय सोडत ठाणे येथील डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह येथे जाहीर केली जाणार आहे. अर्जदारांना सोडतीचा निकाल तात्काळ मोबाईलवर एसएमएस द्वारे , ई-मेल द्वारे तसेच ऍपवर प्राप्त होणार आहे.

कोकण मंडळाच्या संगणकीय सोडतीमध्ये IHLMS 2.0 संगणकीय प्रणाली व ऍपच्या साहाय्याने अर्ज नोंदणी प्रक्रियेस १४ जुलै, २०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजेपासून सुरवात होणार आहे. सोडतीत सहभाग घेण्याकरिता अर्जदार IHLMS 2.0 ही सोडतीची संगणकीय आज्ञावली अर्जदार अँड्रॉइड (android)अथवा आयओएस (ios)या दोन्ही ऑपरेटिंग सिस्टिमच्या साहाय्याने आपल्या मोबाईलवर डाउनलोड करू शकतात. तसेच अर्जदारांच्या सोयीकरिता https://housing.mhada.gov.in या म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज नोंदणी प्रक्रिया उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्जदारांना नवीन संगणकीय प्रणालीची माहिती देणारी मार्गदर्शनपर

माहितीपुस्तिका, ध्वनीचित्रफिती, हेल्प फाईल आणि हेल्प साईट या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. सोडत प्रक्रियेत सहभाग घेण्यापूर्वी अर्जदारांनी या मार्गदर्शनपर माहितीचे अवलोकन करावे, असे आवाहन कोकण मंडळाच्या मुख्य अधिकारी श्रीमती रेवती गायकर यांनी केले आहे.

सोडतीसंदर्भात अर्ज भरतांना अर्जदारांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी ०२२ - ६९४६८१०० या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

श्रीमती गायकर यांनी सोडतीत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांना आवाहन केले आहे की, नूतन संगणकीय सोडत प्रणाली ही संपूर्णतः ऑनलाईन व पारदर्शक असून यामध्ये कोणत्याही प्रकारे मानवीय हस्तक्षेपास वाव नाही. शिवाय या सदनिकांच्या विक्रीकरिता मंडळाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट नेमलेले नाही. त्यामुळे अर्जदाराने कोणत्याही त्रयस्थ /दलाल/ मध्यस्थ व्यक्तीच्या प्रलोभनांना बळी पडू नये. तसेच अशा प्रकारच्या गैरव्यवहारास अथवा फसवणुकीस कोंकण मंडळ अथवा म्हाडा जबाबदार राहणार नाही. तसेच त्यांनी आवाहन केले आहे की सोडत प्रक्रियेमध्ये म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावरून सहभाग घ्यावा.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com


==========================================================

Outward No. : 816/92 Dt. 12th July 2025

**Press Release**

# MHADA's Konkan Board Announces Lottery for 5,285 Flats and 77 Plots

- Go-Live event to be held on July 14, 2025, by MHADA VP & CEO, Mr. Sanjeev Jaiswal, IAS
- Computerised draw of eligible applications on September 3, 2025

Mumbai, July 12, 2025: The Konkan Housing and Area Development Board, a regional unit of the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA), has announced a lottery for the sale of 5,285 residential flats under various housing schemes in Thane city and district and Vasai (District: Palghar), along with 77 plots located in Oros (District: Sindhudurg) and Kulgaon-Badlapur.

The registration and application process for the lottery will commence with a Go-Live event scheduled on Monday, July 14, 2025, at 1:00 PM. The event will be inaugurated by MHADA Vice President and Chief Executive Officer Mr. Sanjeev Jaiswal, IAS.

The lottery is structured into five components. Under the 20% Inclusive Housing Scheme, 565 flats are available. Under the 15% Integrated Urban Housing Scheme, 3,002 flats are offered. An additional 1,677 flats under the Konkan Board Housing Scheme, including scattered units in existing locations, and 41 flats designated under the 50% Affordable Housing category are also available. Furthermore, 77 residential plots are being offered under the Konkan Board Housing Scheme.

Online applications can be submitted until 11:59 PM on August 13, 2025. The earnest money deposit (EMD) payment can be completed online until 11:59 PM on August 14, 2025. Applications that are complete in all respects and supported by required documents will be considered eligible.

The provisional list of eligible applications will be published on August 21, 2025, at 6:00 PM on MHADA's official website: https://housing.mhada.gov.in. Applicants may raise claims or objections regarding the provisional list until August 25, 2025, 6:00 PM. The final list of eligible applicants will be published on September 1, 2025, at 6:00 PM on the same website.

The computerised draw will be conducted for eligible applications on September 3, 2025, at 10:00 AM at Dr. Kashinath Ghanekar Auditorium, Thane. Applicants will receive lottery results via SMS, email, and the mobile application.

The application process will be conducted through the IHLMS 2.0 digital platform, starting from July 14, 2025, at 1:00 PM. Applicants may download the official MHADA Lottery App compatible with both Android and iOS platforms. Application registration is also available at https://housing.mhada.gov.in. For applicant support, guidance documents, videos, help files, and a dedicated help site have been provided on the same platform. Konkan Board Chief Officer Mrs. Revati Gaikar has advised all applicants to refer to these materials before applying.

For assistance during the application process, applicants may contact the helpline number 022-69468100.

Mrs. Gaikar further stated that the new computerised lottery system is entirely online and transparent, with no scope for human interference. The Board has not appointed any representative, advisor, or property agent for this sale process. Applicants are therefore advised not to respond to any third-party offers or intermediaries. MHADA or the Konkan Board will not be responsible for any fraudulent dealings. Participation must be made only through the official MHADA website.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA